## प्रकरण दुसरे

### गोपाळ कृष्ण गोखले जीवन परिचय

## प्रकरण दुसरे

### गोपाळ कृष्ण गोखले जीवन परिचय

रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुका आहे. चिपळूण तालुक्यात पेटा गुहागर या भागात वेळणेश्वर नावाचे एक लहानसे खेडे आहे. सर्व गोखले मंडळींचे हेच मुळ ठिकाण होय. येथूनच सर्व महाराष्ट्रभर गोखले मंडळी पसरली. गोखले मंडळी महाराष्ट्राच्या इतिहासात प्रसिध्द आहेत.

"रास्ते" घराणे मूळचे गोखले घराण्यापैकीच होय. त्यांच्या रास्त वर्तणुकीमुळे शाहू महाराज त्यास रास्ते म्हणू लागले. या गोखले मंडळींची एक शाखा चिपळूणापासून दहा मैलावर असलेल्या ताम्हनमळा या गावी बाळाजी महादेव गोखले यानी प्रथम आणली.

पूर्वी कोकणात पुष्कळ उद्योगी लोक स्वकष्टाने पडीत जमीनी मशागतीस आणीत. दगडधोंडे बाजूस काढून व जंगले तोडून तेथे गाव वसवित असत. मग त्याना तेथील खोतीचे अधिकार मिळत. हे अधिकार ते मग प्राण गेला तरी सोडीत नसत. मानहानी ही कोकणातील माणसास कधीच सहन होत नसते. गोपाळरावांचे निपणजे बाळाजी महादेव यांनी आपला मुळचा गाव सोडून हा नवीन गाव (ताम्हनमळा) वसविला. आणि आपला संसार थाटला. त्यांचा मुलगा भास्कर आणि भास्कररावांचे चिरंजीव श्रीधरपंत होत.[१] श्रीधरपंत हे गोपाळरावांचे आजोबा होत.

श्रीधरपंताना प्रथम कुटुंबापासून अंताजीपंत आणि कृष्णराव हे दोन मुलगे झाले. कृष्णराव दोन-चार महिन्याचे असतानाच त्यांची मातोश्री निवर्तली आणि श्रीधरपंतानी द्वितीय विवाह केला. या द्वितीय विवाहापासून त्यांना दोन मुलगे झाले. त्यांची नावे अनुक्रमे जयरामपंत व माधवराव अशी होती. अंताजीपंत आणि कृष्णराव हे लहानपणीच पोरके झाले होते. हे दोघे भाऊ अगदी एकचित्ताने राहत असत. अंताजीपंताचे कृष्णरावावर फार प्रेम असे.

कृष्णरावांचा स्वभाव मुळत:च फार हूड होता. गावात त्यांना वाघोबा असे म्हणत असत. त्यांचा विवाह त्या काळास अनुसरून लहानपणीच झाला होता. चिपळूणपासून जवळच असलेल्या कोतळूक गावचे, खोत भास्करपंत ओक यांची मुलगी वालुबाई, हिच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. सासरी वालुबाईचे नाव सत्यभामाबाई असे ठेवण्यात आले. सत्यभामा-कृष्णरावजी गोखल्यांच्या उदरी आलेले द्वितीय चिरंजीव म्हणजे, पुढे अद्वितीय देशसेवक ठरलेले भारत-सेवक नामदार गोपाळ कृष्ण गोखले होत. [२]

जन्म, बालपण आणि शिक्षण :

गोपाळ कृष्ण गोखले अशा महान विभूतीपैकी एक आहेत की, ज्यांनी गरीबीमध्ये शिक्षण घेतले आणि स्वत:ची योग्यता व प्रामाणिकपणामुळे देशातील एक प्रमुख नेता व प्रामाणिक देशभक्त अशी पदवी मिळविली. [३] गोपाळ कृष्ण गोखले यांचा जन्म ९ मे १८६६ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुक्यातील कोथरूक या गावी झाला. कोथरूक हे गोखल्यांच्या आईचे माहेर होय. [४] सत्यभामाबाई या वेळेस माहेरी बाळंतपणासाठी गेल्या होत्या. माहेरी दोन-तीन महिने राहिल्यानंतर बालबाळंतीण ताम्हणमळ्यास आली.

गोखल्यांचे मूळ गाव ताम्हनमळा होय. गोखले हे चित्पावन ब्राह्मण होते. पेशव्यांच्या राज्यात एकेकाळी गोखले घराण्याला बरीच प्रतिष्ठा आणि मानमतराब होता. ताम्हनमळा येथे त्यांच्या वाटयाला आलेला जमीनीचा लहानसा तुकडा आणि खोतीचे अधिकार यावरच त्यांचे जीवन अवलंबून होते.

पोट भरण्यासाठी कृष्णरावांना नोकरीची नितांत आवश्यकता होती. तरुणपणी कृष्णरावांनी मोठी स्वप्ने पाहिली. त्यांनी इंग्रजी शिकण्यासाठी खूप धडपड केली. शिक्षणासाठी ते कोल्हापूरला गेले. तेथे न्या. रानडे यांचे ते सहाध्यायी होते. पण गरीबीमुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडावे लागले. आणि कागल येथे अल्पशा वेतनावर कारकुनाची नोकरी पत्करावी लागली. बढती

12416
A

मिळता-मिळता कृष्णराव पोलीस खात्यात फौजदारच्या हुद्यापर्यंत गेले. त्याकाळी कागलसारख्या संस्थानात मिळणारा पगार अत्यंत अल्प होता. त्या पगारात दोन मुलगे आणि चार मुली असलेल्या मोठ्या संसाराची तोंड मिळवणी करतांना त्यांना फार प्रयास पडत.

त्यांची पत्नी सत्यभामाबाई अत्यंत भाविक, कष्टाळू आणि शालीन होत्या. कृष्णरावांना इंग्रजी शिक्षण घेता आले नव्हते. पण गोविंद आणि गोपाळ या आपल्या दोन मुलांना इंग्रजी शिक्षण देण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. कागलसारख्या ग्रामीण परिसरांत प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर दोघेही भाऊ पुढच्या शिक्षणासाठी १८७६ साली कोल्हापूरात आले. कोल्हापूरात येवून तीन वर्षे होतात न होतात तोच इ.स. १८७९ साली कृष्णरावांचा मृत्यू झाला.[५] वडिलभाऊ गोविंदराव अठरा वर्षांचे होते. त्यांच्यावर कुटुंबातील कर्त्या पुरुषांची जबाबदारी येवून पडली. त्यांनी पुढील शिक्षण थांबविले आणि कागल संस्थानात पंधरा रुपये पगारावर नोकरी स्वीकारली. गोपाळचे वय त्यावेळी अवघे १३ वर्षांचे होते. शिक्षण थांबवून घरास हातभार लावणेसाठी अर्थार्जन करण्याची तयारी त्याने दाखविली. पण गोपाळने शाळा सोडावी ही कल्पना गोविंदरावांना मान्य नव्हती. आपल्या अल्प पगारातील अर्धी रक्कम ते गोपाळच्या स्वाधीन करीत राहिले. १८८१ साली गोपाळराव मुंबईमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले.[६]

मॅट्रिकनंतर गोपाळराव कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात दाखल झाले. राजाराम महाविद्यालय तेव्हा नवीनच सुरु झाले होते. त्यामुळे तेथे केवळ पहिल्या वर्षाचीच सोय होती. इ.स. १८८२ मध्ये गोपाळराव तेथून पहिले वर्ष उत्तीर्ण झाले. पुन्हा त्यांच्यापुढे पुढील शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला पण ते काळजी करीत बसले नाहीत. पुण्यात तेव्हा डेक्कन महाविद्यालय सुरु होते. पण तेथे सर्व श्रीमंतांची मुले शिक्षण घेत असत आणि गोपाळराव तर अत्यंत गरीबीत वाढलेले होते. तरी त्यांनी त्याच महाविद्यालयात प्रवेश घेतला.

पहिली सहामाही तेथे पूर्ण केली. एवढ्यात कोल्हापूरला दुस-या वर्षाचीही सोय झाली. मग दुसरी सहामाही कोल्हापूरला काढून त्यांनी दुसरेही वर्ष पदरात पाडून घेतले. [७]

गोपाळराव जात्याच हुषार होते. पण त्यांच्या शिक्षणाची परवड झाली होती. कोल्हापूरला दुस-या वर्षानंतरची सोय नव्हती. पुण्याचे डेक्कन कॉलेज परवडणारे नव्हते. पुन्हा पुढील शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला. संकटे कितीही आली तरी शिक्षण अर्धवट सोडावयाचे नाही असा त्यांनी निर्धार केला. अखेर गोपाळराव १८८४ साली मुंबईला पोहोचले. तेथे त्यांनी एल्फिन्स्टन महाविद्यालयात नाव दाखल केले आणि गणित हा ऐच्छिक विषय घेऊन बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

बी.ए. झाल्यावर आय्.सी.एस्. व्हावे असा एक विचार त्यांच्या मनात आला. पण त्या परीक्षेला खर्च फार येत असे. आजपर्यंत भावाने सहाय्य केले होते. येथून पुढे त्याला आर्थिक त्रास देणे त्यांना योग्य वाटले नाही. वकील होण्याचीही त्यांची इच्छा होती. पण तेथेही आर्थिक परिस्थितीचा प्रश्न होताच. मग इंजिनिअरींगला जायचे ठरले. इंजिनिअरींग महाविद्यालयात नाव नोंदवून तेथे जावयास सुरवातही केली. पण एवढ्यात डेक्कन महाविद्यालयांत वकीलीचा वर्ग निघाला आणि गोपाळरावांच्या मनात इंजिनिअरींग की, वकीली असे द्वंद सुरु झाले. त्यात वकीलीचा विजय झाला.

वकीलीचा खर्च भागविण्यासाठी नोकरीचाही ते शोध घेवू लागले. बी.ए. ची पदवी हाती होती. सरकारी नोकरीही हात जोडून उभी होती. पण गोखले ध्येयवादी होते. त्यांना आपल्या ध्येयाला साजेशी नोकरी हवी होती. आणि तशी ती त्यांना मिळालीही.

जानेवारी १८८५ मध्ये सह-शिक्षक म्हणून गोखले पुण्यात न्यू इंग्लिश स्कूल मध्ये रूजू झाले. वाघिणीचे दूध असलेले इंग्लीश शिक्षण लोकापर्यंत

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पोहोचविण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या चित्पावन ब्राम्हण तरुणांच्या एका मंडळीने पाच वर्षापूर्वी ही शाळा सुरु केली होती. [८] केवळ पोटापुरते वेतन घेऊन आयुष्यभर शिक्षण कार्याला वाहून घेण्याची शपथ घेतलेले हे तरुण स्वत:ला "इंडिअन जेसुईट" म्हणावित असत.

न्यू इंग्लीश स्कूल मध्ये प्रथम चवथ्या इयत्तेत व पुढे पाचव्या इयत्तेत गोपाळराव इंग्राजी शिकवित असत. शिकवावयाचा धडा इतका तयार करुन ते वर्गावर जात की, पुस्तक न उघडताच ते धड्याचा उलगडा शब्दश: करीत असत. १८८६ मध्ये मॅट्रिकच्या वर्गाला ते गणित शिकवावयास होते.

पुढे फर्ग्युसन कॉलिजात प्राध्यापक म्हणून शिकवू लागल्यावर वयाने लहान पण बुध्दीने तरतरीत अशा त्या मूर्तीचे विद्यार्थी जगतात मोठेच कौतुक होवू लागले. फर्ग्युसन कॉलिजात गोखले गणित व इंग्राजी या विषयाबरोबर इतिहास आणि अर्थशास्त्र हे विषयही शिकवू लागले. पुढे पुढे तर ज्या विषयाला शिकविण्यास प्राध्यापक नसेल त्याची तयारी रात्रभर करुन गोखले तो विषय दुस-या दिवशी वर्गात सराईतपणे शिकवू लागले. गोपाळराव गोखले म्हणजे नडलेल्या विषयाचे प्राध्यापक असे एक विनोदी समीकरण कांही दिवस होवून बसले होते.

त्यांची स्मरणशक्ती विलक्षण होती. उत्तारेच्या उत्तारे ते पाठ करीत असत. आपल्या पाठांतर शक्तीविषयी गोखल्याना अभिमान होता. पाठांतर स्पर्धेसाठी ठेवलेली एक आणा देण्याची पैज ते जिंकत असत. "गोखल्यांच्या चूकांच्या जोरावर कोणालाही द्रव्यलाभ झाला नाही" असे श्रीनिवास शास्त्रीनी लिहिले आहे. [९] स्कॉटची "रोकबी" मिल्टनचे "पॅराडाईज लॉस्ट" आणि एड्मंड बर्क व जॉन ब्राईट यान्ची व्याख्याने गोखल्यांनी संपूर्ण पाठ केली होती, असे म्हणतात. पुढच्या काळात, फर्ग्युसन कॉलिजात शिकवित असतांना, सकाळी नजर फिरविलेल्या वर्तमानपत्रांमधील अग्रलेखांतील उत्तारे गोखले विनासायास शब्दनशब्द आठवू शकत असत आणि विद्यार्थ्यांना उतरवून देत. [१०]

गोखले यांनी विद्यादानाच्या कार्याला वीस वर्षे वाहून घेण्याची केलेली प्रतिज्ञा पाळली. अशा बाण्याची माणसे जेव्हा आपले आयुष्य शिक्षणकार्याला समर्पण करतात तेव्हाच शिक्षण फलदायी होते आणि विद्यार्थ्यांच्या शिलाची घडण चांगली होते. गोखले यांनी फर्ग्युसन कॉलेजात वीस वर्षे व्यतीत केली ते जरी जाहीर सभातून फारसे दिसत नव्हते. तरीदेखील अनेक तरुणांना त्यांच्यापासून स्फूर्ती मिळाली. [११]

गोखले - रानडे भेट :

आगरकरांनी गोखल्यांच्या ठिकाणी सार्वजनिक कार्याला आवश्यक असणारे गुण ओळखून, शिवराम हरी साठे नामक एका रानड्यांच्या विश्वासू स्नेह्यामार्फत गोखल्याची व रानड्यांची भेट घडवून आणली. रानड्यांना या भेटीत योग्य शिष्य मिळाला व गोखल्यांना चांगल्या गुरूची प्राप्ती झाली. नंतर गोखले सार्वजनिक सभेचे चिटणीस होवून देशकार्य करु लागले. सार्वजनिक सभेच्या कामाशिवाय ते आगरकरांच्या "सुधारक" पत्राच्या इंग्रजी विभागाकडे लेख लिहित असत. इ.स. १८८९ मध्ये कॉंग्रेसच्या अधिवेशनात गोखले प्रथम बोलले व कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांवर त्यांची छाप पडली. परंतु सा-या हिंदुस्थानात त्यांची प्रशंसा होण्याचा प्रसंग त्यांनी इंग्लंडमध्ये जावून वेल्वी कमीशनपुढे दिलेल्या साक्षीचा आहे. [१२]

म. गांधी गोखल्यांचे शिष्य :

म. गांधीसारखा जगद्विख्यात शिष्य गोखल्याना लाभला नसता तर महाराष्ट्राला त्यांच्या योग्यतेची ओळख करुन घेण्याची कधीच इच्छा झाली नसती. गोखले गांधी भेट प्रथम इ.स. १८९६ मध्ये झाली. [१३] गांधीजींनी त्या भेटीची माहिती एका लेखात दिली आहे. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी रहिवाशांचे गा-हाणे घेवून गांधी हिंदुस्थानात आले होते. त्यानी प्रथम मुंबईच्या व नंतर पुण्याच्या पुढा-यांच्या भेटी घेतल्या. त्यांनी आपल्या ह्रदयात गुरुकरीता मांडलेले सिंहासन कोण जिंकतो याची पाहणी प्रत्येक पुढा-याची भेट झाल्यानंतर ते करीत होते. गोखले भेटेपर्यंत ते सिंहासन रिकामेच होते. गोखल्यांनी ते सिंहासन

काबीज केल्याचा अनुभव गोखल्याच्या भेटीनंतर गांधीना आला. गांधीजी स्वत:ला गोखल्यांचे राजकीय शिष्य म्हणवीत असत. त्यांनी गोखल्याचे केलेले वर्णन प्रत्येकाने मुळातून वाचावे असे आहे. या वर्णनाचे आता स्वतंत्र पुस्तक प्रसिध्द आहे.

उलट गांधीजींची थोरवी गोखल्यानी ओळखली होती. जेव्हा गांधीजींचे नाव हिंदी जनतेला नुकतेच ऐकू येवू लागले होते तेव्हा म्हणजे इ.स.१९०९ साली एका कॉंग्रेसच्या अधिवेशनात गोखल्यानी गांधीजींची प्रशंसा केली. "गांधीच्या कर्तुत्वात दिसूळ मातीतून लोखंडाच्या कठीणपणाचे वीर उदयाला आणण्याची किमया आहे." "गांधीनी हिंदी मानवतेची पराकाष्ठा गाठली आहे." [१४] अशा अर्थाचे शब्द त्या वर्णनात आहेत. गांधीनी हिंदुस्थानात यावे असा गोखल्यांचा आग्रह होता. त्याप्रमाणे १९१४ साली ते इकडे आले. गोखल्यांच्या सांगण्यावरून त्यानी येथे येताच प्रथम देशभर प्रवास केला. गोखल्यांचा (Spiritualisation of Politics.) हा मंत्र ते सारखा या प्रवासात उच्चारीत होते.

गोखल्यासंबंधी गांधीजींची आदरयुक्त भावना त्यांच्या आत्मचरित्रात व द.आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या इतिहासात वारंवार प्रगटलेली दिसते. अगदी अलीकडचे उदाहरण १९३३ सालचे असून ते महादेव भाईच्या रोजनिशीच्या तिसऱ्या खंडात आहे. गोखल्यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाषण करण्यासाठी त्याना बोलावणे आले होते. त्याचे उत्तर लिहिताना गांधीजीनी म्हटले आहे की, "गोखल्यांची देशभक्ती ओळखण्याची पात्रता देशात नसल्याने मी त्यांची महती स्वस्त करू इच्छित नाही. उठल्यासुटल्या गोखल्याविषयी व्याख्यानें देणे म्हणजे त्यांचा उपमर्द करण्यासारखे आहे." सदर उत्तरातले गांधींचे मनोगत दुर्लक्ष करण्यासारखे नाही.[१५]

पहिला संस्मरणीय विजय :

लॉर्ड वेल्बी यांना गोखल्यांनी अजरामर करून ठेवले आहे. गोखल्यांचा लॉर्ड वेल्बी व वेल्बी कमीशन यांच्याशी संबंध आला नसता तर ते दोघेही अंधारात राहिले असते. या कमिशनपुढे साक्ष देण्याची व पुरावा मांडण्याची संधी

गोखल्यांना मिळाल्यामुळे त्यांना आपण अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी पुरुष व देशभक्त आहोत हे सिध्द करता आले.

वेल्बी कमिशन हे भारतातील लष्करी व मुलकी खात्यांचा खर्च कसा केला जातो याची चौकशी करण्याकरीता नेमले होते. भारत सरकार व ब्रिटिश सरकार या दोघांमध्ये खर्चाची विभागणी कशी करावयाची हे कमिशनपुढील मुख्य काम होते. हे कमिशन पार्लमेंटने स्वत:च्या मार्गदर्शनासाठी व आत्म-समर्थनासाठी नेमले होते. या कमिशनच्या १४ सभासदापैकी ११ सरकारी सभासद होते म्हणजे ते बहुमतात होते. अल्पमतात असलेले तिघे सभासद म्हणजे दादाभाई नौरोजी, सर विल्यम वेडरबर्न व डब्ल्यू अेस. केन हे होते.

या कमिशनपुढे साक्ष देण्यासाठी कांही भारतीय पुढाऱ्यांना बोलावण्यात आले होते. त्या पुढाऱ्यात सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, दिनशा वाच्छा, सुब्रम्हण्यम् अय्यर व गोपाळ कृष्ण गोखले हे होते. कमिशनच्या पुढे कोणाही भारतीयाची साक्ष होवू नये अशी कमिशनची इच्छा होती, पण दादाभाई नौरोजी यांच्या-सारखी व्यक्ती कमिशनची सभासद असल्यामुळे तसे घडणे अशक्य होते. जे भारतीय लोकांचे शिष्टमंडळ इंग्लंडला गेले होते. त्यात गोखले हे सर्वात तरुण होते. डेक्कन सभेचे प्रतिनिधी म्हणून गोखल्यांची निवड झाली होती. त्यांनी आपले काम अत्यंत चांगल्या प्रकारे बजावले त्यामुळे ते भारताच्या राजकीय व आर्थिक क्षेत्रात एकदम प्रसिध्दीस आले.

गोखल्यांनी या कमिशनपुढील साक्षीत सांगितले, "सध्या नियंत्रक सत्ता तिघांच्या हाती आहे. १) प्रांतिक सरकारवर नियंत्रण ठेवणारे भारत सरकार. २) भारत सरकारवर नियंत्रण ठेवणारा भारत मंत्री, ३) पार्लमेंट. पण ब्रिटिश पार्लमेंटवर कोण सत्ता गाजवितो ? अर्थात आपले प्रतिनिधी निवडण्याचा ज्यांना हक्क आहे असे ब्रिटिश लोक. यावरुन भारत हा येथील कर भरणाऱ्यांकडून नियंत्रित केला जात नाही, तर इंग्लंडमधील कर भरणाऱ्यांकडून नियंत्रित केला

जातो. अशा परिस्थितीत इंग्रजाकडून देशाचे कल्याण होईल अशी अपेक्षा कशी करता येईल ? जिंकलेल्या देशाची जास्तीत जास्त पिळवणूक करून आपल्या तुंबड्या जास्तीत जास्त भराव्या अशीच त्यांची इच्छा असणार नाही का ? राणीचा जाहीरनामा तसेच इतर अनेक कायदे होते. पण ते फक्त पुस्तकी होते. भारतावर प्रत्यक्ष सत्ता चालविणारी एकच शक्ती होती आणि ती म्हणजे भारत मंत्री ही होय. अंदाजपत्रके विचारासाठी पुढे मांडण्यात येत, पण ती मंजूर करण्यासाठी नसत, असे गोखले म्हणत. या अर्थसंकल्पात कोणाला कांही सुधारणा सूचविण्याचा किंवा विषय बदलण्याचा अधिकार नव्हता. कोणालाही तसा ठराव मांडता येत नसे. कारण अंदाजपत्रक आधीच पक्के झालेले असे."[१६]

सरकारच्या या बेजबाबदारपणाबद्दल व हुकुमशाही धोरणाबद्दल बोलताना गोखले म्हणाले, "१८५८ च्या भारत सरकार कायद्याचे ५५ वे कलम भारताबाहेरील कामासाठी भारताचा पैसा खर्च केला जावू नये यासाठी आहे. पण हे कलम आपल्या उद्दिष्टाच्या बाबतीत पूर्णपणे निरुपयोगी ठरले आहे हे आता सर्वांना पूर्ण ठाऊक झाले आहे. इस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत भारताच्या तिजोरीचे याहून चांगल्याप्रकारे संरक्षण केले जात होते. कंपनीच्या राजवटीपेक्षा ब्रिटिश सरकारचा प्रत्यक्ष अंमल अधिक वाईट ठरला. कंपनी भारतीय जनतेचे हितसंबंध व ब्रिटिश जनतेचे हितसंबंध या दोहोमधील संरक्षक या नात्याने काम करीत होती. कांही मर्यादेपर्यंत कंपनीने भारतीय लोकांच्या हितसंबंधाचे रक्षण केले. पण ब्रिटिश सरकारची प्रत्यक्ष राजवट सुरु होताच थोडे फार संरक्षण होते तेही नाहीसे झाले." [१७]

कमिशनने गोखल्यांची कसून व कडक तपासणी केली व आपण अनुभवी व जबाबदार राजकारणी मुत्सदी आहोत हे गोखल्यांनी सिध्द केले. गोखल्यांनी केलेली कांही विधाने चुकीची आहेत हे त्यांनी कबूल करावे असा प्रयत्न करण्यात आला. पण तो प्रयत्न असफल झाला. उदा. गोखल्यांनी केलेल्या आपल्या लेखी पुराव्यात असे विधान केले होते की, जनतेची अधिकाधिक पिळवणूक करण्यासाठी

अधिकाधिक रेल्वे बांधल्या जात आहेत. त्यांनी तोंडी जबानीत या मुद्याचा अधिक विस्तार केला. रेल्वेमुळे दळणवळण अधिक सुलभ झाले आणि दुष्काळ-पीडीत भागाला अन्नधान्य पाठविण्याच्या कामी अतिशय उपयोग झाला, ही गोष्ट गोखल्यांनी मान्य केली. पण रेल्वेचा हा विस्तार व्यापारासाठीच होता व तो भूतदयेने प्रेरित झालेला नव्हता. भारतात मालाची अंतर्गत वाहतूक करण्याच्या कामापेक्षा अन्नधान्य व कच्चामाल परदेशात निर्यात करण्यासाठी त्याचा उपयोग होत होता. देशातून जो मौल्यवान कच्चा माल परदेशी जात होता त्याच्या बदलात स्वस्त व अनावश्यक परदेशी माल भारतात येत होता. आणि या मालाच्या वाहतुकीत सरकारी संस्था गुंतलेली होती. आयात होणाऱ्या या परेदशी मालामुळे देशी उद्योगधंदे मारले जात आहेत व कारागिरांना देशोधडीला लावले जात आहे असे गोखले यांनी ठामपणे प्रतिपादन केले.

गोखल्यांची साक्ष बारा व तेरा एप्रिल १८९७ या दोन दिवशी झाली. वेल्बी कमिशनच्या चौकशीचा निष्कर्ष विशेष महत्त्वाचा नव्हता. "द हिस्ट्री ऑफ इंडियन नॅशनल कॉंग्रेस" या पुस्तकातील पुढील उतारा लक्षात ठेवण्यायोग्य आहे. "वेल्बी कमिशनमुळे भारताला जो किंचित दिलासा मिळाला तो ब्रिटिश शिपायांच्या पगारवाढीमुळे नाहीसा झाला व भारताच्या तिजोरीवर ७,८६,००० पौंडाचा नवीन बोजा बसला."[१८] वेल्बी कमिशनने केलेल्या शिफारसी वरकरणी स्वीकारण्यात आल्या, पण जे बेकायदेशीर होते ते निराळ्या स्वरूपात व निराळ्या प्रकाराने कायदेशीर करण्यात आले.

गोखल्यांना एवढेच समाधान होते की, आपण अंगिकारलेले कार्य सिध्दीस गेले. त्यांनी तेथे कोणत्या प्रकारची कामगिरी केली त्याचे वर्णन त्यांनी गणेश व्यंकटेश जोशी यांना १६ एप्रिल, १८९७ रोजी इंग्लंडहून लिहिलेल्या पत्रांत केले आहे. ते लिहितात, "सोमवारी व मंगळवारी माझी साक्ष झाली आणि ती इतकी उत्तम होईल अशी मला कल्पनाही नव्हती. माझ्या अपेक्षेपेक्षाही ती सरस झाली. मंगळवारी साक्ष संपल्यानंतर सर विल्यम वेडरबर्न माझ्याकडे आले

व म्हणाले, "तुम्ही मोठे नामांकित काम केले आहे. तुमची साक्ष आपल्या बाजूच्या दृष्टीने उत्कृष्ट ठरली जाईल. तुम्ही आपल्या देशाची ही जी बहुमोल सेवा केली आहे त्याबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. तुमच्या या साक्षीवरच आपल्या अल्पमतवाल्यांचा अहवाल आधारलेला राहील." सर विल्यम वेडरबर्न यांच्या म्हणण्याप्रमाणे लॉर्ड वेल्बी व कमिशनचे इतर सभासद यांच्यावर माझा अतिशय प्रभाव पडला. आपले दादाभाईही फार खुष झाले. मि.केन हे पहिल्या दिवशी कांही तास माझी साक्ष चालू असताना हजर होते. ते लिहितात, "तुम्ही दिलेली साक्ष वाचून, तिचा काळजीपूर्वक अभ्यास करण्यात मी सात तास खर्च केले होते. यापेक्षा अधिक चांगले व अधिक प्रभावी रीतीनेकेलेले निवेदन मी यापूर्वी कधी पाहिले नव्हते. एका सुशिक्षित भारतीय सुधारकांने घेतलेल्या विविध विषयांचा परामर्श इतका श्रेष्ठ दर्जाचा असेल असे मला वाटले नव्हते. तुमची सर्वच मते मला मान्य आहेत असे नाही, पण कमिशनवर त्यांचा प्रभाव पडला असला पाहिजे. तुम्ही आणि वाच्छांनी तुमच्या देशाची जी महत्वपूर्ण व अपूर्व सेवा केली आहे. त्याबद्दल तुमच्या देशबांधवानी सदैव कृतज्ञ असले पाहिजे."[१९]

<u>सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे संपादक गोखले :</u>

भारतभर आणि इंग्लंडमध्येही प्रसिद्ध झालेली पुण्याची सार्वजनिक सभा इ.स. १८७० साली स्थापन झाली. इ.स. १८८९ पासून सभेने क्रॉफर्ड या लाचखाऊ अधिकाऱ्याने जे अनर्थ केले होते. त्याविरुद्ध मोठे आंदोलन सुरु केले. या चळवळीचा परिणाम म्हणून सितारामपंत चिपळूणकर यांनी सार्वजनिक सभेच्या चिटणीस पदाचा राजीनामा दिला. सितारामपंतानी सभेच्या चिटणीसपदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली होती. सभेने जे त्रैमासिक सुरु केले होते त्याचेही संपादक म्हणून ते मोलाची कामगिरी करीत होते. क्रॉफर्ड प्रकरणात क्रॉफर्डसारख्या अधिकाऱ्याबद्दल असलेल्या निरपेक्ष स्नेहाखातर त्यांनी सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे संपादकत्व सोडून दिले. अशा आणिबाणीच्या काळात सभेच्या चिटणीसपदाची आणि सभेच्या त्रैमासिकाच्या संपादकत्वाची जबाबदारी गोखल्यावर पडली.[२०] त्यांच्या संपादकत्वाखाली त्रैमासिकाचे २६ अंक प्रसिद्ध

झाले. त्यापैकी गोखल्यांनी लिहिलेले आठ-नऊ लेख आहेत. संपादक या नात्याने कार्य करीत असताना त्याना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. हे त्रैमासिक इंग्रजी भाषेत निघत असे. तसेच ज्यांना इंग्रजी मासिक घेणे परवडत असे किंवा ज्यांना अशा मासिकांत गोडी असे, असे लोक संख्येने फारच कमी होते.

त्रैमासिकाच्या संपादकीय बरोबर ते आगरकरांच्या सुधारकचे संपादक म्हणूनही कार्य करीत असत. सुधारकचा संपादकीय विभाग गोखल्यांनी चार वर्षे सांभाळला. त्यातील लेखांनी प्रभावित होवून राज्यपालसुध्दा सुधारकचे वर्गणीदार झाले होते. या सुधारकाच्या संपादकीय कारकिर्दीत आगरकरांना "आम्ही तुमचा खून करु" म्हणून आलेली पत्रेही त्यांनी पाहिली होती. तरीही त्या दबावाला न भिता ते आपले कार्य करीत असत.[२१]

## काँग्रेसमधील कार्य :

गोखले व टिळक १८८९ मध्ये काँग्रेसमध्ये दाखल झाले. गोखल्यांच्या वयाचा देशसेवा करु इच्छिणारा कोणताही तरुण त्या काळात काँग्रेसपासून दूर राहणे शक्यत नव्हते. स्वार्थत्यागाची भावना, नैतिक धैर्य, निःस्पृह वृत्ती, आत्मसंयम हे गुण असलेले आणि देशात लोकशाही सरकार स्थापन करण्यासाठी आयुष्य वेचण्याची तयारी असलेले निदान पन्नास तरुण श्री. ए.ओ. ह्यूम यांना हवे होते. या पन्नासात गोखले यांचा सहज समावेश झाला असता. देशकार्यासाठी हजारो तरुण पुढे आले. पण अशा उमेदीचे फारच थोडे होते.

काँग्रेसच्या जन्माच्या वेळी गोखले किंवा टिळक यापैकी कोणीही हजर नव्हते. रानडे हे काँग्रेसच्या संस्थापकांपैकी एक होते आणि त्यांच्या प्रेरणेने गोखले काँग्रेसला येऊन मिळाले होते. काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाचा मान पुण्याला मिळणार होता. पण साथीचा रोग उद्‌भवल्यामुळे अधिवेशन मुंबईस भरविण्याचे ठरले. १८८९ साली काँग्रेसचे आणखी एक अधिवेशन मुंबईस भरले. सर

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

विल्यम वेडरबर्न अध्यक्षस्थानी होते. या १८८९ च्या काँग्रेसला जे प्रतिनिधी हजर होते, त्यांची संख्या योगायोगाने काँग्रेसच्या सालाइतकी म्हणजे १८८९ इतकीच होती. पार्लमेंटचे सभासद चार्ल्स ब्रॅडला हे या अधिवेशनाला हजर होते. पार्लमेंटमध्ये बिल आणून भारतातील कायदे मंडळे कशी बनवावी यासंबंधीचा एक ठराव वादग्रस्त ठरला. या ठरावाला टिळकांनी एक उपसूचना मांडली की, प्रांतिक कायदेमंडळाच्या सभासदांनी सुप्रीम कायदेमंडळाच्या सभासदांची निवड करावी. गोखल्यांनी या उपसूचनेला पाठिंबा दिला. गोखले व टिळक यांच्यामधील संबंध पुढील काळात बदलले, हे लक्षात घेता हा प्रसंग अगदी दुर्मिळ ठरला. ही उपसूचना नामंजूर झाली. पण हा एकमेव प्रसंग होता की ज्याबद्दल गोखले व टिळक यांचे एकमत झाले.

कांही अधिवेशने सोडली तर काँग्रेसच्या बहुतेक अधिवेशनांना आयुष्याच्या अखेरपर्यंत गोखले हजर राहिले. चिकित्सा समितीच्या कामामुळे १९०३ साली ते हजर राहू शकले नाहीत. १९१३ व १९१४ मध्ये ते आजारी असल्यामुळे गैरहजर राहिले. काँग्रेसच्या कामकाजात ते उत्साहाने भाग घेत आणि काँग्रेसपुढील ठरावावर ते भाषणे करीत. प्रभावी वक्तृत्व, विषयाचे संपूर्ण ज्ञान आणि पुढे असलेला विषय परिणामकारकपणे मांडण्याची हातोटी यामुळे काँग्रेस पुढा-यांचे त्यांच्याबद्दल चांगले मत झाले व देशाचे भावी नेते या दृष्टीने ते त्यांच्याकडे पाहू लागले. [२२]

## मुंबई विधिमंडळातील कार्य :

ना. गोखले यांनी वीस वर्षे फर्ग्युसन महाविद्यालयात चांगल्या प्रकारे कार्य केले. त्या काळात त्यांनी कै. म.गो. रानडे यांचेपासून राजकीय शिक्षण घेतले. त्यामुळेच त्यांना मुंबई कायदेमंडळातील आपली कामगिरी यशस्वीपणे पार पाडता आली. [२३]

मुंबई विधिमंडळात निवडून आल्यानंतर इ.स.१९०० मध्ये पहिल्याच भाषणात त्यांनी दुष्काळपीडितांच्या समस्या सरकारच्या निदर्शनास आणल्या आणि

सरकारचे त्यासंबंधीचे कर्तव्य काय तेही सुचविले. त्यांनी आपली सर्व विधाने आकडे देवून सिध्द केली होती. अंमलदार कर कसा जुलमाने वसूल करतात, ज्याच्याकडून कर वसूल होत नाही, त्यांचा कसा छळ करण्यात येतो हे खानदेश वगैरे जिल्ह्यातील प्रत्यक्ष उदाहरणांनी गोखल्यांनी सिध्द केली. आपल्या राहत्या गावापासून मजुराला किंवा शेतकऱ्याला दुष्काळी कामासाठी लांबवर पाठवणे त्याला परवडत नाही असे सांगून गोखल्यांनी "अल्पप्रमाणात उद्योगधंदे" ज्या त्या स्थानिक क्षेत्रात सुरु करण्याबद्दल सूचना केल्या.[२४] लोकांच्या सुखदु:खाशी समरस होवून त्यांची बाजू विधिमंडळात प्रभावीपणे मांडणारा प्रतिनिधी लोकांना हवा होता, तो गोखल्यांच्या रूपाने मिळाला.

३० मे १९०१ रोजी विधिमंडळात मुंबई सरकारने लँड अलिनिएशन बिल आणले. त्याच्यावर हल्ला करण्यात वृत्तपत्रे, राजकीय संस्था व शेतकरी वर्ग जेवढा पुढे आला, त्यापेक्षाही त्या विधेयकाचे वाभाडे विधिमंडळातील सभासदांनी काढले. मुंबई इलाख्यातील लहानमोठया जमिनी कर्जापायी सावकाराच्या ताब्यात जात होत्या, त्याला आळा घालण्यासाठी ते विधेयक होते. बिचाऱ्या शेतकऱ्याने उभे पीक सावकारास गहाण द्यावे, पण जमीन त्यास देता यावयाची नाही, असा त्या विधेयकाचा रोख होता. सरकारी सारा भरण्यास पैसे कमी पडतात म्हणून पुष्कळांनी सावकारांची घरे उपसली होती. शेतसाऱ्यामुळे स्वत: सरकारच सावकारापेक्षाही सावकार झाले होते. जमिनीची तबदिली कायद्याने बंद करून सरतेशेवटी त्या जमिनी सावकाराऐवजी सरकारच बळकावणार हे गोखले वगैरे विधिमंडळातील सभासदांनी अनुभवावरून सिध्द केले. या वर्षी दिलेली सूट पुढील वर्षी वसूल करण्यात येते आणि अशा तऱ्हेने शेतकऱ्यांच्या माना या परंपरागत बाकी वसुलीत आवळल्या जातात असे सांगून गोखले यांनी बजावले की, "आमच्या शेतकऱ्यांच्या प्रस्तुत परिस्थितीत, त्यांच्या मानेभोवती थकबाकीची चक्की न ठेवता, त्या शेतकऱ्यांना आपल्या जीवनाचा नव्यानेच शुभारंभ करावयास मिळाला पाहिजे." उत्पादनवाढीच्या योजना आखून व भू-तारण बँका काढून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे असेही गोखल्यानी सुचविले.

सन १९०१ साली डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल बिलावर बोलतांना गोपाळराव गोखल्यांनी अल्पसंख्य प्रतिनिधी व जातवार प्रतिनिधी सरकारने नियुक्त करावयाच्या बिलाला कडाडून विरोध केला. सदर विधेयक चिकित्सासमितीकडे गेल्यावर त्या चिकित्सा समितीत गोखले असल्याकारणाने ते त्याचा समाचार घेवू शकले.

जमिन तबदीली बंदी विधेयकावरही लोकप्रतिनिधींचे म्हणणे सरकारने ऐकूण घेतले नव्हते. त्या विधेयकाची घाई न करता, सरकारने तूर्त ते तहकूब केले होते. ब्रिटिश राजवटीपेक्षा मुस्लीम राजवटीत शेतकरी अधिक कर्जबाजारी होता या सरकारी विधानाचा त्यांनी इन्कार केला. सरकारच शेतक-यांच्या कळवळ्याच्या नावाखाली त्यांच्या जमिनींचे सरकारीकरण साधण्याच्या प्रयत्नात असल्याबद्दल गोपाळराव गोखल्यांनी सरकारला दोष दिला. त्यापेक्षा शेतक-यांकडील सर्व कर्जे निवारण्याची सरकारने हमी घेऊन सरकारने शेतकी बँका सुरु कराव्यात आणि मग जमीन तबदीली कायदा करावा, असेही गोखल्यांनी सांगीतले.

पण गोपाळराव गोखले, फिरोजशाहा मेहताप्रभृतीच्या विरोधाचा उपयोग झाला नाही. त्यामुळे सर भालचंद्र भाटवडेकर, गोकुळदास पारेख, दाजी आबाजी खरे आणि गोपाळराव गोखले ही मंडळी सरकारच्या निषेधार्थ फिरोजशाहा मेहतांबरोबर विधीमंडळाबाहेर पडली. मुंबई विधीमंडळाच्या लोकप्रतिनिधींनी दाखवलेला हा स्वाभिमान अत्यंत प्रशंसनीय ठरला. कारण सरकारचा तो कायदा कायदेपुस्तकांत केवळ मृताक्षर होवून पडला. [२५]

<u>वरिष्ठ विधिमंडळातील कार्य :</u>

"न्यायमूर्ती रानड्यांनी मला हाताशी धरले. त्यांच्याचरणापाशी बसून शिकण्याची संधी मला मिळाली. म्हणूनच मला आज ही स्थिती प्राप्त झाली आहे." असे उद्गार ना. गोपाळराव गोखल्यांनी पुण्याच्या हिरा बागेतल्या सत्कारास उत्तर देतांना काढले. डॉ. रा.गो. भांडारकर, सखारामभाऊ म्हस्के व न्या. रानडे अशी मंडळी सत्कारास हजर होती. १८९९ साली मुंबई विधी-

मंडळात निवडून आल्याबद्दलचा हा सत्कार गोखल्यांनी अपेक्षेबाहेर कारणी लावला, हे त्यांच्या मुंबई विधिमंडळातील कामगिरीवरून स्पष्ट झाले. पण तेही क्षेत्र आता त्यांच्या बौध्दिक कर्तृत्वाला अपुरे पडू लागले. त्यांची नजर साहजिकच वरिष्ठ विधिमंडळाकडे वळू लागली.

१९०१ नंतर गोपाळरावांचा प्रांतिक कायदेमंडळाचा संबंध तुटला तो कायमचाच. १९०२ पासून दहा वर्षे ते कलकत्ता-दिल्लीच्या वरिष्ठ कायदेमंडळात आपल्या ज्ञानाची व देशभक्तीची कर्तबगारी गाजवीत राहिले आणि हळुहळू ब्रिटिश साम्राज्यातील एक विचारवंत मुत्सदी अशी किर्ती मिळविली. १९०२ साली म्हणजे पहिल्याच वर्षी त्यांनी सरकारी जमाखर्चाच्या अंदाजपत्रकांवर जे भाषण केले, त्यायोगाने भारतीय जनतेच्या अंतरंगात गोखल्यांना आदराचे स्थान निर्माण झाले. गोखल्यांचा विशेष हा की, या स्थानावरून ते कधीच खाली आले नाहीत. त्यांनी आपल्या अंदाजपत्रकावरील वार्षिक भाषणांचा सरकारात वचक उत्पन्न केला होता. लष्करी खर्चावर त्यांचा फारच कटाक्ष होता.

किचनेर हा ईग्लंडचा रणशूर सेनापती त्यांच्या भाषणांतील अचूक भडिमाराबद्दल "तोफखान्यापुढे उभे राहण्याची भिती वाटत नाही, पण गोखल्याशी सामना कसा करावयाचा याबद्दल मन चिंताक्रांत असते" असे म्हणत असल्याचे प्रसिध्द आहे. लॉर्ड कर्झन हा व्हाइसरॉय साम्राज्यशाहीचा अर्क होता. त्याला आपल्या हुषारीबद्दल गर्व असे, परंतु गोखले वारल्याचे कळल्यावर त्यानेही "गोखल्यांचे तडाखे आपल्याला कधी कधी असह्य होत. गोखले हे कोणत्याही स्वतंत्र देशांत मुख्य प्रधान होण्याच्या लायकीचे पुरूष होते" असे उद्गार काढले. गोखले शेवटच्या दुखण्यांत कायदेमंडळाच्या बैठकीला जाऊ शकले नाहीत. त्यांच्या गैरहजेरीकडे लक्ष जाऊन सर गाय फ्लीटवूड विल्सन नावाच्या हिंदी सरकारच्या फडणिसाने "आज आपण हॅम्लेट हे नाटक हॅम्लेटवाचून करीत आहो."[२६] असे बोलून कायदेमंडळाचा खरा नायक गोखले अशी स्वत:ची भावना व्यक्त केली. गोखल्यांच्या व्यवहारातील निर्भेळ सचोटीमुळे लॉर्ड मिंटो, लॉर्ड हार्डिंज, हे व्हाईसरॉय त्यांचे मित्र झाले होते. गोखल्याबद्दल त्यांना मित्रत्वाचा विश्वास वाटत असे.

विल्सन हा विलायतचा नामांकित व उदार विचारांचा अर्थशास्त्रज्ञ होता. विलायतेहून इकडे येण्यास निघाला असता अनेकांनी त्याला गोखल्यांच्या हल्ल्यांचे भय सांगितले होते. त्याने येथे येऊन अंदाजपत्रक तयार केले व गोखले कोठून कसा हल्ला करतील याचे चिंतन करीत असता त्याच्या हाती अनपेक्षितपणे गोखल्यांचे पत्र पडले, "तुम्ही नवीनच आलेले आहांत व नामांकित आहांत. शिवाय हिंदी राजकीय आकांक्षाबद्दल सहानुभूती बाळगणारे असा तुमचा लौकिक आहे. म्हणून या वर्षी मी नेहमींच्या पध्दतीने अंदाजपत्रकांवर टीका करणार नाही." कोणत्याही देशात प्रतिपक्षाबद्दल असे मनाचे औदार्य दाखविले जात नाही. हे पत्र लिहून गोखल्यांनी आपणास जिंकले असे या माहितीचे तात्पर्य विल्सनने नमूद केले आहे. [२७]

शैक्षणिक कार्य :

शिक्षण हा गोखल्यांच्या आवडीचा विषय होता. इ.स. १८८४ मध्ये पदवी परीक्षा पास झाल्यानंतर गोखल्यांनी टिळक आणि चिपळूणकर यांनी सुरु केलेल्या न्यू इंग्लीश स्कूल मध्ये नोकरी धरली. १८८४ मध्ये टिळक, आगरकर, नामजोशी इ. मंडळींनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. इ.स. १८८५ च्या जानेवारीत सोसायटीने स्थापन केलेल्या फर्ग्युसन कॉलेजचे काम सुरु झाले. गोखले या कॉलेजमध्ये प्राध्यापक झाले. कॉलेजमध्ये ते इतिहास आणि अर्थशास्त्र हे विषय शिकवित असत. इ.स. १८८६ मध्ये गोखले या सोसायटीचे आजीव सदस्य झाले. [२८] सोसायटीच्या आजीव सदस्यांना वीस वर्षेपर्यंत कमी वेतनावर काम करावे लागत असे.

शिक्षण हे राष्ट्राची उन्नती करण्याचे एक साधन आहे. असा गोखल्यांचा दृढ विश्वास होता. डिसेंबर १९०३ मध्ये विश्वविद्यालय विधेयक जेव्हा कौन्सिल-पुढे आले तेव्हा त्यांच्यातील शिक्षणतज्ज्ञपणा दिसून आला. विश्वविद्यालये आणि महाविद्यालये राजद्रोही विचाराचे अड्डे बनले असून, ती पूर्णपणे सरकारी

नियंत्रणाखाली आणली पाहिजेत, असे सरकारला वाटू लागले होते. त्यामुळे सरकारने हे बिल मांडले होते. सुशिक्षित वर्गात सरकारबद्दल तीव्र असंतोष वाटू लागला होता. अत्युच्च पदव्या प्राप्त केलेल्या भारतीयांना युरोपीय लोकांइतका पगार किंवा त्याच्या बरोबरीच्या अधिकाराच्या जागा सरकार देत नव्हते. चांगली पात्रता असलेल्या कित्येक सुशिक्षितांना नोकरी मिळत नव्हती. परीक्षांत उत्तीर्ण न होणाऱ्यांची संख्याही पुष्कळ होती. थोडक्यात म्हणजे सुशिक्षित वर्गात सर्वत्र असंतोष पसरला होता. याचा परिणाम असा झाला की, कांही जणांच्या डोक्यात क्रांतीकारी विचार येऊ लागले. या गोष्टीने सरकार बेचैन झाले आणि याला उपाय म्हणून आपल्या कडक शिस्तीखाली विश्वविद्यालये आणण्याची गरज सरकारला वाटू लागली.

विश्वविद्यालयांची सिंडीकेट आणि सीनेट व महाविद्यालये सरकारी अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा सरकारचा विचार होता.

गोखल्यांनी या बिलाला विरोध केला. त्यावरील चर्चेच्या वेळी एकूण सहा भाषणे केली. या नव्या बिलाने, अस्तित्वात असलेली सारी सीनेट निष्प्रभ ठरणार होती. एवढेच नव्हे तर नव्या सीनेटच्या नेमणुकीत त्यांना कोणताच मताधिकार ठेवला नव्हता. आक्षेपाचा दुसरा मुद्दा असा की, या बिलांत प्राध्यापकांना मताधिकार नव्हता. शिवाय सीनेटच्या सभासदांची संख्या फारच कमी केली होती. सभासदत्वाची कालमर्यादा पाच वर्षे ठेवली होती. गोखले म्हणाले की, या नव्या घटनेमुळे विद्यापीठाच्या प्रशासनाशी भारतीयांचा संबंध राहणार नाही व विश्वविद्यालये यूरोपिय प्राध्यापकांच्या हाती जातील. आणि सरकारला नेमके हेच हवे होते.[२९] लोकप्रतिनिधींच्या विरोधाला न जुमानता सरकारने ते बिल मंजूर करुन घेतले. निरनिराळ्या विश्वविद्यालयाच्या चॅन्सेलर्सनी नवा कायदा अंमलात आणण्याचे आदेश दिले. हे आदेश बेकायदा होते. पण त्याना कायदेशीर करण्यासाठी सरकारने एक बिल आणले. या बिलालाही गोखल्यानी विरोध केला. न्यायालयाच्या हक्काचे व अधिकारांचे अतिक्रमण करण्याची रीत त्यांना आवडली नाही. सरकारने सद्भाव बाळगावा व औचित्य दाखवावे असे त्यांचे म्हणणे होते.

पण त्यांचा कांहीही परिणाम झाला नाही. ज्या सरकारच्या उदारमतवादावर त्यांचा विश्वास होता त्याने प्रजेवरील आपली पकड घट्ट करण्यासाठी असल्या प्रतिगामी उपयांचा अवलंब करावा याचे गोखल्यांना व त्यांच्यासारख्या इतरांना फार दु:ख झाले.

१८ मार्च १९१० रोजी वरिष्ठ कायदेमंडळात गोखल्यांनी पुढील ठराव मांडला. संपूर्ण देशात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याच्या दृष्टीने सरकारने पाऊल टाकावे व त्यासाठी सरकारने सरकारी व बिनसरकारी सभासदांचे एक शिष्टमंडळ लवकर नेमून त्यांच्याकडून सूचना मागवाव्या अशी शिफारस हे कौन्सिल करीत आहे. हा ठराव मांडताना गोखल्यांनी जोरदार भाषण केले. उत्कट भावना, भरपूर आकडेवारी आणि मुद्देसुद युक्तीवाद यामुळे ते भाषण चिरस्मरणीय ठरले. इतर सुधारलेल्या राष्ट्रांचे अनुकरन करून सरकारने लोकांना साक्षर करण्याचे आपले कर्तव्य पार पाडावे असे त्यांनी जाहीर केले. जगातील पुढारलेल्या देशांच्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रगतीचा इतिहास त्यांनी सांगितला व सरकारने जपानचा आदर्श घ्यावा असे सुचविले. भारतात शिक्षणाकडे कसे दुर्लक्ष होते हे त्यांनी आकडेवारीने दाखवून दिले. गेल्या पंचवीस वर्षात प्राथमिक शाळांमध्ये जाणाऱ्यांचे प्रमाण लोकसंख्येच्या १.२ टक्क्याचे फक्त १.९ टक्के इतके झाले. प्राथमिक शिक्षणावरील खर्च केवळ ५७ लक्ष रुपयांनी वाढला. १९१० साली हा खर्च ९३ लक्ष होता. याच काळांत जमीन महसूल ९ कोटी रुपयांनी वाढला व लष्करी खर्च १९ कोटीऐवजी ३२ कोटी रुपये झाला.

ही स्थिती सुधारण्यासाठी कित्येक विधायक उपाय गोखल्यांनी सूचविले. त्यांनी सूचविले की प्राथमिक शाळांमधून आजच्या चौपट मुले गेली पाहिजेत. अर्थातच त्यावर होणारा खर्च चौपटीने तरी वाढवायला हवा. यापैकी दोन तृतीयांश खर्च सरकारने सोसावा व एक तृतीयांश खर्च स्थानिक संस्थाकडे सोपवावा. यामुळे सरकारचा खर्च फक्त सुमारे २$\frac{2}{3}$ कोटी रुपयांनी वाढेल. ही वाढ एकूण वीस वर्षात झाली तरी मला चालेल, असे गोखले म्हणाले.

सहा ते दहा वर्षापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे, ही सक्ती जेथे शेकडा ३३ टक्के पुरुष शिकत असतील त्या भागात प्रथम सुरु करावी. व्यावहारिक अडचणीमुळे तूर्त मुलींना या सक्तीतून वगळावे. जेथे शिक्षण सक्तीचे केले जाईल तेथे ते मोफत असावे. यामुळे वाढणारा खर्च दोनास एक या प्रमाणात सरकार व स्थानिक संस्था यानी विभागून घ्यावा. गृहखात्यात शिक्षणविषयक एक वेगळा चिटणीस नेमण्यात यावा. अशा पुष्कळ सूचना गोखल्यांनी केल्या इतकेच नव्हे तर हा जादा खर्च भागविण्यासाठी पैसा कोठून उभा करावा तेही त्यांनी सांगितले. [30]

आफ्रिकेतील दौरा :

इ.स. १९१२ मध्ये म. गांधीच्या निमंत्रणाचा स्वीकार करुन गोखले दक्षिण आफ्रिकेत गेले. त्यांच्या भेटीचे तेथील भारतीयांनी स्वागत केले. दक्षिण आफ्रिकेचे सरकार आणि युरोपियन रहिवाशी यांनी देखील उत्साहाने या स्वागतसमारंभात भाग घेतला. त्यांच्या भेटीमुळे दक्षिण आफ्रिकेतल्या भारतीयांचा प्रश्न थोडाफार सुटेल अशी आशा निर्माण झाली. जनरल बोथा आणि जनरल स्मट्स यांना भेटून गोखल्यांनी चर्चा केली. भेटीनंतर महात्मा गांधीना, त्यांनी ज्या काळ्या कायद्याविरुध्द लढा दिला तो रद्द करण्यात येईल. वसाहतीत येणाऱ्या लोकांत जो वांशिक भेद करण्यात येत असे तोही दूर होईल तसेच तीन पौंड कर द्यावा लागणार नाही अशी आशादायक वार्ता कळविली. पण दक्षिण आफ्रिकन सरकार आपले वचन पाळणार नाही अशी गांधीजींनी गोखल्यांजवळ भीती व्यक्त केली होती, तीच खरी ठरली. सरकारने आपले वचन पाळले नाही आणि आपले जुने अन्यायी धोरण चालू केले.

हिंदी लोकांची अवस्था सुधारली नाही. गोखल्यानी गांधीजींच्या संमतीने द.आफ्रिकेत जाणाऱ्या भारतीयांच्या संख्येवर नियंत्रण घालण्याचे दिलेले वचन पाळून गौरवर्णीयांना भारतीयांच्या वाढत्या संख्येमुळे वाटणारी भीती दूर

केली. म. गांधींना पुन्हा सत्याग्रह सुरु करावा लागला. हजारो हिंदी लोक तुरुंगात गेले. गोखल्यांनी फंड जमवून मोठी रक्कम लढयास मदत म्हणून गांधीजींना पाठविली. व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंज यांनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या गा-हाण्याबद्दल सहानुभूतीदर्शक भाषण केले. त्याचा चांगला परिणाम झाला. म. गांधी आणि द. आफ्रिकेचे सरकार यामध्ये सन्मान्य तडजोड झाली. भारतीय स्वाभिमानावरील कलंक दूर झाला. गांधीजींना आपले काम संपवून १९१५ च्या सुरवातीस हिंदुस्थानात परतणे शक्य झाले.

१९१२ मध्ये याच प्रश्नावर गोखल्यांनी इंपीरियल लेजिस्लेटिव्हमध्ये दुसरा ठराव आणला. हिंदुस्थानात किंवा कोणत्याही ब्रिटिश वसाहतीत कामासाठी अशी मजूर भरती करण्यावर कायद्याने बंदी घालण्यात यावी असे सुचविले होते. त्यांनी आपल्या भाषणात ही पध्दत, गुलामगिरी कायद्याने बंद करण्यात आल्यावर निरनिराळ्या वसाहतीत कशी सुरु झाली, लॉर्ड सँडर्सन यांच्या कमिटीने १९१० मध्ये प्रसिध्द केलेल्या अहवालात तिचे वर्णिलेले स्वरुप कोणते आहे हे सांगितले. ही पध्दत माणुसकीला काळीमा फासणारी आहे. नुकताच गुलामगिरीतून मुक्त झालेला निग्रोदेखिल तिच्यात आपली मान अडकवू इच्छित नाही. ज्या कराराने मजुरास बांधण्यात येते त्यामध्ये ज्या विशिष्ट कायद्यामुळे हा करार मोडल्यास फौजदारी गुन्हा ठरतो त्याचा उल्लेख नसतो. मजुराना निष्काळजीपणा, दुर्लक्ष किंवा मॅनेजरला साधे दुरुत्तर केले तरी सक्तमजुरीची शिक्षा मिळते. पण करारामध्ये अशी अट आहे हे त्यांना सांगण्यात येत नाही. ही पध्दत अन्यायी व राक्षसी असून तिचा अंमल फसवणूक आणि जुलमी सत्तेमुळे चालू राहिला आहे. हे कोणीही सज्जन माणूस मान्य करील, आजच्या न्याय आणि मानवतेच्या कल्पनांना धक्का देणारी ही पध्दत चालू ठेवणे म्हणजे त्या देशाच्या संस्कृतीला एक कलंकच आहे. मानवी दु:खाचे त्यांनी एक ह्दयस्पर्शी चित्र रेखाटले व याला हीच पध्दती जबाबदार आहे असे सांगितले. [३१]

गोखले म्हणाले, "आपल्या घरांपासून हजारो मैल दूर गेलेले हे लोक या दास्यातून मुक्त होण्यासाठी..... पायी घरी येण्यास निघतात. मध्ये समुद्र उसळतो आहे याची त्यांच्या साध्या भोळ्या मनाला कल्पनादेखील नसते. त्यांना वाटते, कोठून तरी सुटकेचा मार्ग असेल. त्यांना मार्गातच कैद करण्यात येऊन परत नेण्यात येते. ज्या खाले-यातून ते पळून गेलेले असतात त्यांत पुन्हा डांबण्यात येते. कधी ते वाटेत वन्यपशूंच्या भक्ष्यस्थानी पडतात. किंवा भूक, तहान, थंडी यांना बळी पडतात. मानवी यातनांचे हे भयानक चित्र ज्याचा विचारदेखिल असह्य होतो. म्हणजे या पद्धतीविरुद्ध टाहो फोडणारी साक्ष आहे. या मजूरांमध्ये मृत्यूचे आणि आत्महत्त्येचे प्रमाण फार मोठे आहे. गुलामीच्या या यातनातून सुटण्यासाठी पुष्कळांनी आत्महत्या केली आहे. ज्यांना अशा जगण्यापेक्षा मृत्यू श्रेयस्कर वाटला. या पद्धतीप्रमाणे प्रत्येक १०० पुरुषांमागे ४० स्त्रियांच फक्त भरती करता येतात. या चाळीस स्त्रियांत कांही अनैतिक आचरण करणा-या असतात. याचा परिणाम म्हणजे अनीती बोकाळते. हा या लोकावरच नव्हे तर भारताच्या नावावर देखील कलंक आहे. ज्यांनी या वसाहतीला भेट दिली आहे. त्यांना विचारले तर ते माझ्या म्हणण्याची सत्यता पटवून देतील. पाव एक शतकांपूर्वी पूर्व पॅसिफिक महासागराच्या मध्यभागी असलेल्या फिजी बेटाला मी भेट दिली होती. तेव्हा तेथील हिंदी लोकांची स्थिती पाहून परदेशातले लोक भारताच्या लोकाबद्दल मत बनवतात असा मला अनुभव आला." [३२]

गोखल्यांनी ठराव आणला त्यावेळेस अशा पद्धतीने मजूर भरती आसाममधल्या मळ्यात काम करण्यासाठी देखिल होत असे. ती १९१३ पासून बंद करण्यात येईल, असे सांगण्यात आले.

गोखल्यांनी दाखविलेले या पद्धतीतील भयंकर दोष खरे होते व हिंदी मजुरांना फार यातना सहन कराव्या लागत. तरीही काहीतरी गैरलागू मुद्दे उपस्थित करून सरकारने ठरावास विरोध केला व तो ३३ वि. २२ मतांनी नापास झाला. पण १९१३ मध्ये ब्रिटिश गिनी, त्रिनिदाद, जमेका आणि फिजी

इ. देशांत गेलेल्या हिंदी मजुरांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक कमिटी नेमली. या कमिटीचा अहवाल १९१५ मध्ये प्रसिध्द झाला. १९१६ मध्ये सी. एफ्. अँन्ड्र्यूज आणि पिअर्सन यांचा फिजीमधील हिंदी मजुरांच्या स्थितीवर प्रकाश टाकणारा अहवाल प्रसिध्द झाला. तो गोखल्यांच्या स्मृतीला अर्पण करण्यात आला होता. दोन्ही अहवालांत हिंदी मजुरांना सहन कराव्या लागणाऱ्या भयंकर यातनावर प्रकाश टाकण्यात आला होता. ते वाचून भारतात या मजूरभरतीच्या पध्दतीविरुध्द क्षोभ निर्माण झाला. १९१६ मध्ये पंडित मदन मोहन मालवीय यांनी सुप्रीम लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये ठराव आणून या पध्दतीवर ताबडतोब बंदी घालण्याची मागणी केली. व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांनी सरकारच्या वतीने, चर्चेवर भाषण करतांना ठरावाला मान्यता दिली, तरी सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या अटीप्रमाणे दुसरी एखादी पध्दत निघून वसाहतीत जाणाऱ्या मजुरांचा प्रश्न, कलोनियल ऑफिस आणि वसाहती यांच्याशी विचारविनीमयाने सुटेतोपर्यंत प्रचलित पध्दत चालू राहील असे सांगितले. पण थोड्या काळानंतर ही पध्दत बंद करण्यात आली.[33]

## पब्लिक सर्व्हिस कमिशन :

कमिशन नेमल्याची घोषणा १९१२ च्या ऑगस्ट ३१ ला झाली आणि हिंदुस्थानात येवून त्याच्या प्रत्यक्ष कामाला ३१ डिसेंबर १९१२ रोजी सुरुवात झाली.[34] त्या कमिशनचे अध्यक्ष लॉर्ड इस्लिंग्टन हे होते. कमिशनमध्ये एकूण बारा सभासद होते. त्यात सर महादेव चौबळ, ना. गोखले व मद्रास हायकोर्टाचे न्यायाधीश अब्दुल रहीम असे तीघे भारतीय होते.

कमिशनला तीन गोष्टींची चौकशी करावयाची होती.

१) जे सनदी नोकर निवडले जातात, त्यांना शिकविण्याची पध्दती आणि पसंतीसाठी कांही दिवसांची उमेदवारी,

२) नोकरीच्या अटी, पगार, रजा, पेन्शन इ.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

३) युरोपियनाशिवाय इतर लोकांना सनदी नोकरी मिळवितांना येणारे अडथळे आणि प्रांतिक आणि वरिष्ठ अशी विभागणी.

१८३३ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने नोक-या देताना युरोपियन व हिंदी असा भेद करू नये असा ठराव केला होता. १८५४ मध्ये सिव्हिल सर्व्हिस परीक्षेस हिंदी लोकांना परवानगी मिळाली. १८५८ व १८६१ मध्ये त्याच मान्यतेची पुनरावृत्ती झाली. १८७० मध्ये दादाभाईंनी समान हक्काबद्दल इंग्लंडमध्ये चळवळ केली होती. १८६६ मध्ये पब्लिक सर्व्हिस कमिशनचे काम झाले त्यावेळी रानडे सभासद होते. त्यानंतर पंचवीस वर्षांनी नेमलेल्या या पब्लिक सर्व्हिस कमिशनवर गोखल्यांची नेमणूक झाली होती. कमिशनचे काम अत्यंत दगदगीचे होते. रोज सहा-सहा तास साक्षी ऐकून नंतर घरी त्यावर विचार करून साक्षीदाराची उलट तपासणी करावी लागत असे.

ज्या दिवशी ज्यांच्या साक्षी असतील, त्यांची लेखी उत्तरे रात्री दोन-तीन वाजता उठून गोपाळराव बारकाईने वाचून ठेवीत. कमिशनचे काम साधारणपणे सकाळी दहापासून सायंकाळी पांच वाजेपर्यंत चालत असे. साक्षीदार पुढे आला की, प्रथम अध्यक्षाने प्रश्न विचारायचे व नंतर इतरांनी उत्तराच्या अनुरोधाने प्रश्न विचारायचे अशी पध्दत होती. ब-याच जणांनी प्रश्न विचारल्यानंतर मग तसाच महत्त्वाचा विषय असेल तर गोपाळराव प्रश्न विचारीत असत.

कमिशनने सुरुवातीला आपल्या कामाचा जो आराखडा निश्चित केला होता त्यात उदारपणाचा अंश विशेष नव्हता. हिंदी लोक राज्यकारभारातील उच्च अधिकार देण्याच्या लायकीचे नाहीत, असे प्रतिपादण्याची यथेच्छ संधी हिंदुस्थानातल्या इंग्रज अधिका-यांना, व्यापा-यांना, मिशन-यांना देणारा तो आराखडा होता. कमिशनच्या कामातून हिंदी जनतेच्या हिताची इष्ट निष्पती निघण्याची फारशी आशा नव्हती. तरी आलेली संधी दवडू नये, म्हणून गोपाळरावांनी कमिशनच्या कामाचा भार अंगावर घेतला होता. हिंदी लोक नालायक आहेत,

हिंदुस्थानात इंग्रजांचे राज्य टिकले पाहिजे, असे सिध्द करण्याचा हेतू साक्षीदारांच्या बोलण्यात दिसला की, गोपाळराव त्याच्या त्या हेतूचा निकाल लावण्याकरिता त्याला प्रश्न विचारीत.

लंडनच्या मुक्कामात व येथेही हिंदी जनतेच्या आकांक्षा धुडकावून लावण्याच्या प्रवृत्तीचे अध्यक्षासह जे इतर इंग्रज सभासद कमिशनवर होते त्यांची मते हिंदी आकांक्षाविषयी अनुकूल करुन घेण्याची अवघड कामगिरी गोपाळराव आपल्या तर्कशुध्द विचारसरणीने बजावीत होते व ही कामगिरी बरीच यशस्वी होईल अशी त्यांना उमेदही वाटत होती. परंतु त्यांनी ही कामगिरी पूर्ण करावी असा काळाचा संकेत नव्हता. २५ वर्षांच्या अविश्रांत श्रमाने गोखल्यांची प्रकृती ढासळली होती. या कमिशनच्या कामाने तिच्यावर जास्त ताण पडला. परिणामाचा विचार न करता नेहमीच्या उत्साहाने आणि पूर्णतेने त्यांनी कमिशनच्या प्रश्नांचा अभ्यास सुरु केला. त्यांनी हिंदी लोकंच्या कार्यक्षमतेबद्दल आणि शिलाबद्दल अवहेलनेने बोलणाऱ्या कांही प्रमुख टीकाकारांची जी उलट तपासणी घेतली, तिच्यात त्यांचे या विषयावरील आश्चर्यकारक प्रभूत्व प्रकट झाले. ज्यानी कमिशनच्या कामाकडे काळजीपूर्वक लक्ष दिले होते त्यांनी गोखल्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली. हे काम पुरे करण्याची त्यांना फार इच्छा होती पण दुर्दैवाने ती अपुरीच राहिली. कमिशनच्या शिफारसी तयार होत असतानाच त्यांना मृत्यू आला. १९१७ मध्ये या शिफारसी प्रसिध्द झाल्या तेव्हा लोकांची फार निराशा झाली. शासनसंस्थेतील सर्व मोक्याची स्थाने आपल्याच हातात ठेवण्याचा ब्रिटनचा हेतू सिध्द करणारे आणखी एक प्रमाण असेच त्या शिफारसीचे लोकांच्यादृष्टीने स्वरुप होते. [३५]

<u>परलोकी प्रयाण :</u>

गोखल्यांनी मृत्यूचे स्वागत उघड्या डोळ्यांनी एखाद्या योग्याप्रमाणे केले. शेवटी ते पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामांत मग्न होते. त्या कामानिमित्त मरणापूर्वीच्या कांही महिन्यांत ते इंग्लंडात असतां डॉक्टरांनी त्यांना मृत्यू

येथेच येईल असे निश्चित भविष्य वर्तविले होते." "मी परदेशात मरणार नाही, मी माझ्या जन्मभूमीत गेल्यावरच मरेन" असे या भविष्याला उत्तरे देत असत त्याप्रमाणे ते स्वदेशी आले.

आपल्या एका सहका-याला ते पुष्कळदा टाकून बोलत असत. तो दृष्टीस पडतांच त्याला खुणेने जवळ बोलावून "इहलोकीच्या कारभारांत प्रसंगपरत्वे तुमच्या बाबतीत रागाचे कडक शब्द वापरले ते सर्व विसरून मला क्षमा करा." असे गोखल्यांनी म्हटले. त्या सहका-याचा गळा दाटून आला होता. त्याला शब्द उच्चारता येत नव्हते. पण गोखल्यानी "मागचे सर्व विसरलो, माफी केली." असे त्याला बोलायला लावलेच. आता त्यांचा श्वास जड झाला होता. म्हणून मोकळ्या हवेत जाण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. त्याच सुमारास त्यांच्यासमोर आणखी दोन मित्र आले. "आजवर इहलोकाची मौज पाहिली. आतां परलोकी जात आहो !" अशा अर्थाचे इंग्रजी वाक्य त्यांनी नमस्कारपूर्वक त्यांच्याकडे पाहून उच्चारले. नंतरच्या क्षणातच गोखल्यांच्या जीविताचा दिवा मालवल्याचे दृश्य जमलेल्या सर्वांच्या अनुभवास आले. तो दिवस १९ फेब्रुवारी १९१५ हा होय. [३६]

ना. गोखले यांच्या जीवनातील महत्वपूर्ण घटना :

| इ.स. | | घटना |
|---|---|---|
| १८६६ मे ९ | - | जन्म, कोतळूक येथे |
| १८७१ | - | कागल येथे प्राथमिक शिक्षण सुरु. |
| १८७५ | - | कोल्हापूरात प्रशालेय शिक्षण सुरु. |
| १८८० | - | प्रथम विवाह, भागवत कन्येशी - सौ. सावित्री. |
| १८८१ | - | मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण. |
| १८८२ | - | टिळक, आगरकरावरील बर्वे प्रकरणात त्यांच्या बचावासाठीचे निधीकरीता झालेल्या नाटकांत भूमिका. |

| इ.सन | - | घटना |
|---|---|---|
| १८८४ | - | गणित विषय घेऊन मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजचा विद्यार्थी म्हणून मुंबई विद्यापीठाची बी.ए. परीक्षा उत्तीर्ण. |
| १८८५ जानेवारी | - | १) डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या पुणे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक. |
| | | २) फर्स्ट एलएल.बी. उत्तीर्ण. |
| १८८६ जून | - | १) डेक्कन एज्युकेशन सोसायटीत आजीव सभासद. |
| | | २) "मऱ्हाटा" या इंग्रजी पत्रात लेख. |
| १८८७ | - | १) अंकगणित प्रसिद्ध झाले. |
| | | २) फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकवू लागले. |
| मे | - | ३) द्वितीय विवाह पेंडसे कन्येशी, सौ. राधाबाई. |
| | | ४) न्या. रानडे यांच्याशी परिचय आणि त्यांचे शिष्यत्व. |
| १८८८ | - | १) पुणे सार्वजनिक सभेचे कार्यवाह सन १८९६ पर्यंत. |
| | | २) "सुधारका"च्या इंग्रजी विभागाचे संपादक - सन १८९२ अखेर. |
| | | ३) पहिल्या मुंबई प्रांतिक परिषदेचे टिळक, नामजोशी यांचे सहकार्यवाह . |
| | | ४) पहिले सार्वजनिक भाषण प्रसिद्ध. |
| १८८९ | - | मुंबई येथील कॉंग्रेसच्या ५ व्या अधिवेशनात प्रत्यक्ष भाग घेतला. |
| १८९० | - | सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे संपादक - सन १८९६ पर्यंत. |
| १८९१ | - | १) प्रथम पत्नी सौ. सावित्रीबाईचा स्वर्गवास. |
| | | २) मुंबई प्रांतिक परिषदेच्या चिटणीस पदाचा राजीनामा. |
| १८९२ | - | डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी सन १८९८ पर्यंत. |
| १८९३ | - | १) सुकन्या काशीताईचा जन्म. |
| | | २) मातोश्रींचा स्वर्गवास. |
| | | ३) डे.ए.सो. साठी निधी जमविण्यास सुरुवात. |

१८९५ जुलै १४ - १) सार्वजनिक सभा-पुण्याच्या वार्षिक निवडणुकीत गोखले पक्षास अल्पमत.

२) मुंबई विद्यापीठाच्या सीनेटवर फेलो म्हणून निवड.

३) पुणे काँग्रेस अधिवेशनाचे दुय्यम सेक्रेटरी.

४) राष्ट्रीय सभा समाचाराचे संपादक.

१८९६ ऑगस्ट- १) सार्वजनिक सभा सोडली.

नोव्हेंबर ४-२) डेक्कन सभा स्थापन झाली, तिचे सेक्रेटरी .

३) मोहनदास करमचंद गांधीजीशी पहिली भेट.

१८९७ - १) मार्च पासून जुलै अखेर इंग्लंडमध्ये वेल्बी-कमिशनपुढील साक्षीसाठी.

२) पुणे-प्लेग-शामक उपायात सरकारने अत्याचार केल्याचे आरोप इंग्लंडात मँचेस्टर गार्डियनमधून केले. त्या प्रकरणी माफी मागावी लागली.

३) मोर्लेसाहेबांची पहिली भेट.

१८९८ - १) पुण्याच्या प्लेगच्या कहरात स्वयंसेवक म्हणून रुग्णाशुश्रुषादि सेवा.

२) पुणे नगरपालिकेचे सरकार नियुक्त सभासद.

१८९९ - १) लॉर्ड सँडर्स्ट यांनी प्लेग रुग्णसेवेबद्दल मनमोकळेपणाने प्रशंसा केली.

२) मुंबई-विधिमंडळात निवडून आले.

३) सरकारी "दुष्काळ-निवारण योजने"वर टीका.

१९०० - १) प्लेग - कमिशनवर नेमणूक.

२) द्वितीय पत्नीचा स्वर्गवास.

१९०१ जानेवारी १६ - १) गुरु न्या. रानडे यांचा मृत्यू.

२) जमिनीबाबत कायद्याच्या निषेधार्थ विधीमंडळातून बहिर्गमन.

३) जिल्हा नगरपालिकांतील जातीय प्रतिनिधित्वास विरोध

१९०१ - ४) वरिष्ठ विधीमंडळात निवड.

| | |
|---|---|
| १९०२ – | १) कलकत्त्यास वरिष्ठ विधिमंडळात अर्थसंकल्पावरील पहिले भाषण. |
| सप्टेंबर १९ – | २) फर्ग्युसन कॉलिजमधून निवृत्तीपूर्व रजेवर. |
| | ३) पुणे नगरपालिकेचे अध्यक्ष – १९०५ पर्यंत. |
| १९०३ – | गांधी – गोखले एक महिनाभर कलकत्त्यास. |
| १९०४ – | १) सी.आय्.ई. पदवी मिळाली. |
| | २) डेक्कन एज्युकेशन सोसायटीतून रीतसर निवृत्ती. |
| १९०५ – | १) भारत – सेवक – समाजाची स्थापना. |
| जून १२ | २) पुणे नगरपालिकेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा. |
| | ३) कॉंग्रेसतर्फे इंग्लंडमध्ये सप्टेंबर ते डिसेंबर शिष्टमंडळात. |
| आक्टो.१६ – | ४) इंग्लंडमध्ये वंगभंग झाल्याचे समजले. |
| | ५) लोकमान्यांनी पुण्यास जाहीर सत्कार केला. |
| | ६) वाराणसी कॉंग्रेसचे अध्यक्ष. |
| १९०६ – | १) एप्रिल ते सप्टेंबर कॉंग्रेसतर्फे राजकीय सुधारणासाठी इंग्लंडमध्ये शिष्टमंडळात. |
| | २) कलकत्त्याच्या कॉंग्रेसमध्ये स्वराज्याची चतु:सूत्री संमत. |
| १९०७ – | १) उत्तर हिंदुस्थानात व्याख्यान सत्र. |
| | २) जूनमध्ये वडील बंधूंचा स्वर्गवास. |
| | ३) सुरतेची कॉंग्रेस. |
| १९०८ – | १) सत्ता-विकेंद्रीकरणाबाबत रॉयल कमिशनपुढे पुरावा. |
| | २) इंग्लंडमध्ये मोर्ले-मिंटो सुधारणाबाबत शिष्टाई. |
| | ३) "हिंदु-पंच" व "वंदेमातरम" वर बेअब्रूची फिर्याद. |
| | ४) रानडे अर्थशास्त्र संस्था स्थापन. |
| १९०९ – | मोर्ले-मिंटो सुधारणा अंमलात आणण्यास सुरुवात. |
| १९१० – | १) नाताळ वेठबिगार बंदीचा ठराव . |
| | २) सक्तीचे व मुक्तद्वार प्राथमिक शिक्षण करण्याचा ठराव. |
| | ३) मुद्रण-वृत्तपत्र विधेयकावर टीका. |

| | | |
|---|---|---|
| १९११ | – | १) दक्षिण आफ्रिकेसंबंधात वरिष्ठ विधीमंडळात ठराव. |
| | | २) प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यासंबंधी वरिष्ठ विधीमंडळात विधेयक. |
| | | ३) राजद्रोही सभाबंदी विधेयकास विरोध |
| १९१२ | – | १) सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण करण्यासंबंधीचे विधेयक हाणून पाडले. |
| | | २) मे ते डिसेंबर इंग्लंडला सफर. |
| | | ३) इंग्लंडमध्ये गांधीजींची भेट. |
| १९१३ | – | एप्रिल ते आक्टोबरमध्ये पब्लिक सर्व्हिस कमिशनसाठी इंग्लंडमध्ये. |
| १९१४ | – | १) के.सी.आय्.ई. पदवीस नकार. |
| | | २) पब्लिक सर्व्हिस कमिशनसाठी पुन्हा इंग्लंडला. |
| १९१५ | – | १) गांधीजींची भेट. |
| | | २) गोखल्यांचे राजकीय इच्छापत्र. |
| फेब्रुवारी १९ | | ३) पुणे येथे मृत्यू. [३७] |

........

## प्रकरण दुसरे

## संदर्भ


१) साने गुरुजी, नामदार गोखले चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९२५, पृ. ५,६.

२) गोखले पुरुषोत्तम पांडुरंग, नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचे चरित्र, नीलकंठ प्रकाशन, पुणे-९, प्रथमावृत्ती १९६६, पृ.८.

३) गुप्त केदारनाथ गणेश पाण्डेय, भारत के कर्मयोगी महापुरुष, छात्रहितकारी पुस्तकमाला दारागंज प्रयाग, १९६६, पृ. ५३.

४) Mathur D.B., 'Gokhale - A Political Biography' Manaktalas : Bombay, First Published, 1966, Page 3.

५) नंदा बलराम, गोपाळ कृष्ण गोखले, ब्रिटिश राजवट व भारतीय नेमस्त युग, विश्वकर्मा साहित्य सदाशिव पेठ, पुणे, १९८६, पृ.३५.

६) उक्त, पृ. ३५.

७) वाळींबे मो.मा., महामानव, नामदार गोखले, अरगडे कुलकर्णी प्रकाशन, पुणे-३०, सन १९६९, पृ. ७.

८) नंदा, बलराम, उक्त, पृ.३९.

९) शास्त्री व्ही.एस्.एस्., लाईफ ऑफ गोपाळ कृष्ण गोखले, बंगलोर, १९३७, पृ. ५.

१०) परांजपे आर्.पी. गोपाळकृष्ण गोखले, १९१५, पृ.४.

११) म.गांधी, माझे राजकीय गुरु, चेतक पुस्तके चिराबाजार, मुंबइ-२, प्रथमावृत्ती १९६९, पा.नं. १ व २.

१२) फाटक नरहर रघुनाथ, अर्वाचीन महाराष्ट्रातील सहा थोर पुरुष, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय प्रकाशन, प्रथमावृत्ती १९५१, पृ.९३.

१३) लोकराज्य, १ आक्टोबर, १९९३.

१४) फाटक नरहर रघुनाथ, अर्वाचीन महाराष्ट्रातील सहा थोर पुरुष, उक्त,पृ.१०२,

१५) उक्त, पृ. १०२.

१६) लेखक : देवगिरीकर त्र्यं.र., अनुवाद - कानिटकर रा.प्र. गोपाळ कृष्ण गोखले, प्रकाशन विभाग माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार, १९७१, पृ. ५७, ५८.

१७) उक्त, पृ. ५८.

१८) उक्त, पृ. ६९.

१९) उक्त, पृ. ७०.

२०) नवभारत, नोव्हेंबर, १९६६.

२१) गोखले पुरुषोत्तम पांडूरंग, उक्त, १६९.

२२) लेखक - देवगिरीकर, उक्त, पृ. ७३, ७४.

२३) साप्ताहिक दीनबंधु, मुंबई, १६ डिसेंबर, १९०५.

२४) गोखले पुरुषोत्तम पांडूरंग, उक्त, पृ. ५८.

२५) उक्त,पृ.५९.

२६) फाटक नं.र., अर्वाचीन महाराष्ट्रातील सहा थोर पुरुष, पृ. ९८.

२७) उक्त, पृ. ९८, ९९.

२८) कुंभारु पंडित -हृदयनाथ, गोपाळ कृष्ण गोखले, व्यक्ती आणि कार्य, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली, ९ मे, १९६६, पृ. ४.

२९) लेखक देवगिरीकर, उक्त, पृ. १३१.

३०) उक्त, पृ. १३२.

३१) कुंभारु पंडित -हृदयनाथ, उक्त, पृ. ३८, ३९.

३२) उक्त, पृ. ३ ९.

३३) उक्त, पृ. ३९, ४०.

३४) फाटक नरहर रघुनाथ, आदर्श भारत सेवक, उक्त, पृ. २००.

३५) कुंभारु पंडित -हृदयनाथ, उक्त, पृ. ४१.

३६) फाटक नरहर रघुनाथ अर्वाचीन महाराष्ट्रातील सहा थोर पुरुष, पृ. १०८.

३७) गोखले पु.पा., पृ. २१३, २१४, २१५, २१६.

.....